सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२५/2047
दिनांक :- 17 JUL 2025

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील तांत्रिक व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :-** १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक २/एनजीसी/Intake Approval/२०२५/५०९ दिनांक १७/०६/२०२५.
२. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/२०२५/१४९४ दि. २६/५/२०२५.
३. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/२०२५/१७१४ दि. १९/६/२०२५.
४. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/२०२५/१८२१ दि. २७/०६/२०२५.
५. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/२०२५/१८५१ दि. ०१/०७/२०२५.
६. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/२०२५/१८६० दि. ०१/७/२०२५.
७. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/२०२५/१९५७ दि. ०८/७/२०२५.
८. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक २/एनजीसी/Intake Approval/२०२५/६१७ दिनांक १६/०७/२०२५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी असणा-या विद्यमान संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अद्ययावत करण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्यापपर्यंत काही संस्थांनी त्यांची माहिती https://ugpg25.dtemaharashtra.gov.in या लिंक वर अद्ययावत केलेली नसल्याचे आढळून आलेले आहे. तरी सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती वरील लिंकवर **दिनांक १८/७/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** अद्ययावत करण्यात यावे.

आपणाकडून सदर लिंकवर माहिती सादर न केल्यामुळे केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (CAP) पहिल्या प्रवेश फेरीत संस्थेचा समावेश न झाल्यास त्यास संबंधीत संस्था जबाबदार असतील याची कटाक्षाने नोंद घेण्यात यावी.

**सहपत्र :-** वरील प्रमाणे.

(मनोज म. अंधारे)
**प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्राशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ई-मेल करण्याकरीता.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४७५/४९२/४७५/४४२/४४३/४४७
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https:// dte.maharashtra.gov.in

महत्वाचे
क्रमांक : २ /एनजीसी/Intake Approval/२०२५/ ६९७ दिनांक : 16 JUL 2025

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय ,
मुंबई,पुणे,नाशिक,छत्रपती संभाजी नगर,अमरावती,नागपूर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता विद्यमान तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक
१) २ /एनजीसी/Intake Approval/२०२५/४१८, दिनांक २३.५.२०२५
२) २ /एनजीसी/Intake Approval/२०२५/५०९, दिनांक १७.६.२०२५
३) २ /एनजीसी/Intake Approval/२०२५/५४६, दिनांक ३०.६.२०२५

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी असणा-या विद्यमान संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अद्ययावत करण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात आलेले आहे. तथापि अद्यापपर्यंत काही संस्थांनी त्यांची माहिती https://ugpg२५.dtemaharashtra.gov.in/ या लिंकवर अद्ययावत केलेली नसल्याचे आढळून आलेले आहे.

तरी आपल्या विभागातील सर्व पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती वरील लिंकवर दिनांक १८.७.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करण्याबाबत तात्काळ सूचना देण्यात याव्यात. संस्थांनी सादर केलेली माहिती विभागीय कार्यालयांनी पडताळून ती त्वरीत अद्ययावत करावी. संस्थांकडून सदर लिंकवर माहिती सादर न केल्यामुळे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या प्रवेश फेरीत संस्थेचा समावेश न झाल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्था जबाबदार असतील याची जाणीव संबंधित संस्थांना करुन देण्यात यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १. मा.आयुक्त , राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित
२. कार्यासन अधिकारी, का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई - यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांकडून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्थांची प्रमाणित केलेली माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

F:\BUDAGE\2025-26\CET CELL ARA\Intake Approval Final Letter.docx